<u>प्रेसनोट दिनांक २४/०३/२०२३</u>

**अल्पवयीन मुलांकरवी मोबाईल फोन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक करुन, ०८ मोबाईल फोन हस्तगत**

**खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी**

मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील आधिकारी व अंमलदार यांना मालमत्ता चोरीचे गुन्हयास प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणणे बाबत दिलेल्या आदेशा प्रमाणे, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार यांनी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील उघडकीस न आलेले मालमत्तेच्या गुन्हयांचा घडलेल्या घटनेचा आढावा घेवुन, खंडण् विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे खंडणी विरोधी पथकाकडील सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे हे स्टाफसह हिंजवडी व वाकड भागात पेट्रोलिंग करीत असतांना, पोहवा १३९२ कानगुडे, पोहवा १११७ नलगे व पोना ११२१ गिरीगोसावी यांना मिळालेल्या बातमीवरुन इसम नामे सुरेश दगडू जगताप वय-३८ वर्षे, रा. कुसगाव, जाधव यांचे फार्म हाऊसमध्ये, ता. मावळ, जि. पुणे यास वाकड स्मशानभुमी येथुन ०८ मोबाईलसह ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यात मिळालेल्या मोबाईलबाबत तपास करता, त्याने त्याचा अल्पवयीन मुलगा व भाचा यांचेकरवी हिंजवडी भागातुन चोरी केली असल्याचे सांगितल्याने, हिंजवडी पोलीस ठाणे येथे खात्री करता, त्याबाबत **हिंजवडी पोलीस ठाणे गुरनं २७३/२०२३ भादवि कलम ३८०** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले. नमुद आरोपीकडुन **६५,०००/- रुपये किंमतीचे वेगवेगळया कंपनीचे ०८ मोबाईल फोन जप्त करुन, दाखल गुन्हा उघडकीस आणला** असुन, त्यास पुढील कारवाईकामी हिंजवडी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कारवाई मा.विनय कुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.मनोज लोहीया, सह पोलीस आयुक्त, मा.डॉ.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा.स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा.डॉ.प्रशांत अमृतकर, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद पवार,सहा.पोलीस निरीक्षक उध्दव खाडे, सहा.पो.उप-निरी.अशोक दुधवणे, अमर राऊत, पोलीस अंमलदार सुनिल कानगुडे, किरण काटकर, विजय नलगे, ज्ञानेश्वर कु-हाडे, गणेश गिरीगोसावी, सुधीर डोळस, प्रदीप गायकवाड व प्रदीप गुट्टे यांचे पथकाने केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप-आयुक्त,
गुन्हे, पिंपरी चिंचवड